International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-2 | November - December 2025

**Original Article**

# मराठा आरमाराचा भारतीय नौदलावरील प्रभाव

**प्रा. प्रकाश शामराव नांगरे**

*सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,*

*स.गा.म.कॉलेज, कराड (अधिकार प्रदत्त स्वायत्त)*

**Manuscript ID:**
IJAAR-130211

**ISSN: 2347-7075**
**Impact Factor – 8.141**

**Volume - 13**
**Issue - 2**
**November - December 2025**
**Pp. 57 - 64**

**Submitted:** 12 Dec 2025
**Revised:** 21 Dec 2025
**Accepted:** 25 Dec 2025
**Published:** 1 Jan 2026

***Corresponding Author:***
*प्रा. प्रकाश शामराव नांगरे*

Quick Response Code:

**Website:** https://ijaar.co.in/

DOI:
10.5281/zenodo.18139241

DOI Link:
https://doi.org/10.5281/zenodo.18139241

Creative Commons

OPEN ACCESS

**प्रस्तावना:**

प्रसिध्द मराठी साहित्यिक आचार्य अत्रे म्हणतात "इतर राज्यांना भूगोल आहे,पण महाराष्ट्राला इतिहास आहे!" महाराष्ट्राचा इतिहास इथल्या मातीच्या शौर्याची साक्ष सांगतो. शिछत्रपती शिवाजी महाराजांनी १७ व्या शतकाच्या मध्यावर स्वराज्य निर्मिती केली. स्वराज्याला बळकटी आणण्यासाठी अनेक बलस्थाने निर्माण केली. त्या बलस्थानांचे एक महत्वाचे अंग म्हणजे मराठा आरमार निर्मिती. मराठा आरमाराने समुद्रावर आपल्या अस्तित्वाबरोबर आपल्या वर्चस्वाची स्थापना केली. मराठा आरमारामुळे स्वराज्याला संपन्नता, समृद्धता, संरक्षितता, सामर्थ्य प्रदान झाले. स्वराज्याला आरमाराने स्थिर आधार दिला. स्वराज्याच्या मुलखातील व्यापार-उदिमाला प्रोत्साहन मिळाले, समुद्रपर्यटन निषिद्ध मानणाऱ्या भारतीय उपखंडातील जहाजे आता व्यापारासाठी साता-समुद्रापार जाऊ लागली. तसेच अनेकांना आपल्या गुणांचे प्रदर्शन करण्याची संधी मिळाली आणि त्यातून जगाच्या इतिहासावर आपला ठसा उमटवणारी अनेक गुणरत्ने उदयास आली. या मराठा आरमाराच्या उदयाच्या पार्श्वभूमीचा व आजच्या भारतीय नौदलावरील प्रभावाचा अभ्यास प्रस्तुत शोध निबंधात केला आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
***This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International License (CC BY-NC-SA 4.0),*** *which permits others to remix, adapt, and build upon the work non-commercially, provided that appropriate credit is given and that any new creations are licensed under identical terms.*

***How to cite this article:***
*प्रा. प्रकाश शामराव नांगरे. (2025). मराठा आरमाराचा भारतीय नौदलावरील प्रभाव. International Journal of Advance and Applied Research, 13(2), 57 – 64.* https://doi.org/10.5281/zenodo.18139241

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website: https://ijaar.co.in/*
*Volume-13, Issue-2 | November - December 2025*

**उदिष्ट्ये:**

१) मराठेपूर्व काळातील स्थानिक सत्ता आणि त्यांचे आरमार यांचा आढावा घेणे.

२) भारतीय नौदलाचा पाया घालणाऱ्या मराठा आरमाराच्या उदयाचा ऐतिहासिक दृष्टीकोनातून अभ्यास करणे.

३) मराठा आरमाराचा प्रारंभिक प्रवास आणि विकासाचा अभ्यास करणे.

४) मराठा आरमाराचा भारतीय नौद्‍लावरील प्रभाव अभ्यासणे.

**मराठेपूर्व काळातील स्थानिक सत्ता आणि त्यांचे आरमार:**

भारतीय द्वीपकल्पाला पश्चिमेस विस्तीर्ण असा समुद्र किनारा लाभलेला आहे, कोकण किनारपट्टीचा संपूर्ण भाग हा अनेक खाड्यांमुळे विभागलेला आहे की, जो आरमारातील जहाजांचे उत्तम असे नैसर्गिक आश्रयस्थान आहे. तसेच किनारपट्टी लगत असलेल्या अनेक बेटांवर जलदुर्गांसाठी मोक्याची जागा नैसर्गिकरित्याच तयार झालेली आहे. त्यायोगे भारतीय द्वीपकल्पाच्या पश्चिम किनारपट्टीचा प्रदेश हा आरमारासाठी एक वरदानच आहे. मात्र या वरदानाचा वापर करण्यात स्थानिक सत्ता इच्छाशक्तीच्या अभावाने कमी पडल्या. तत्कालीन राजसत्तांकडून साम्राज्य विस्तार करताना भूविस्तार करण्याकडेच जास्त लक्ष दिले तत्कालीन सातवाहन,चालुक्य,कदंब या स्थानिक सत्तांची आरमारे होती. परंतु काळाच्या ओघात या सत्तांनी आरमाराकडे दुर्लक्ष केले. परिणामतः आपल्या देशातून आरमार व जहाज बनविण्याचे ज्ञान काळाच्या ओघात नष्ट झाले. परिणामतः सागरी भू विस्तार, आरमार या गोष्टींकडे दुर्लक्ष होऊन परकीय सत्तांनी ( पोर्तुगीज, सिद्दी, ब्रिटीश इ.) या गोष्टीचा लाभ घेतला व त्याद्वारेच त्यांनी आपल्या सत्तेचा साम्राज्य विस्तार करताना सागरी प्रभुत्वाचा भरपूर फायदा झाला.

**मराठा आरमाराचा उदय:**

परकीय सत्ताधीशांनी चालवलेली भयंकर लुट, समुद्र किनारपट्टीवरील रयतेला होणार उपद्रव आणि त्यांचे होणारे हाल हे छत्रपती शिवाजी महाराजांना ज्ञात होते. त्यामुळे "सागरी किनारपट्टीचे संरक्षण ही धारणा शिवाजी महाराजांच्या मनात दीर्घकाळ नांदत असावी."[१] मुघल राजपुत्र व दक्षिण प्रांताचा सुभेदार औरंगजेब याने बिदरचा किल्ला विजापूरच्या आदिलशाह कडून सन १६५७ मध्ये मुघलांच्या दक्षिण प्रांतातील साम्राज्य विस्तरांत जिंकून घेतला परंतु दरम्यानच्या काळात मुघल बादशहा शहाँजहान गंभीर आजारी पडल्याने औरंगजेब दक्षिण प्रांतात जास्त वेळ न दवडता उत्तरेच्या राजकारणातील हालचालींवर लक्ष देण्यासाठी तो उत्तरेत गेला. तेव्हा दक्षिण प्रांतात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आणि त्याचा फायदा शिवाजीराजांनी घेऊन उत्तर कोकण १६५९ पर्यंत पूर्णतः स्वराज्यात सामील करून घेतले. १६६१ ते १६६३ पर्यंत शिवाजी महाराजांनी दक्षिण

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/
*Volume-13, Issue-2 | November - December 2025*

कोकण सुद्धा मराठ्यांच्या ताब्यात घेतला. कोकण मोहिमेत सर्वप्रथम त्यांनी इसवी सन १६५६ मध्ये जावळी येथे चंद्रराव मोरेंचा पराभव करून रायरी किल्ला हस्तगत केला, इसवी सन १६५७ मध्ये कल्याण भिवंडी प्रांत आणि सन १६५९- १६६० मध्ये दक्षिण कोकणचा प्रांत स्वराज्यात सामील केल्यानंतर त्यांनी आपला मोर्चा कोकण किनारपट्टीवरून समुद्राकडे वळवला. कोकण प्रांत हस्तगत करत असतानाच इसवी सन १६५७–५९ मध्ये मराठा आरमाराच्या बांधणीला सुरुवात केली. मराठा आरमाराच्या बांधणीला सुरवात कल्याण "दुर्गाडी" येथे झाली. त्यासाठी छत्रपती शिवाजी राजांनी "पोर्तुगीज खलाशी रुय लैतांव व्हीयेगश व त्याचा मुलगा फेर्नांव व्हीयेगश या पिता पुत्राच्या जोडीला जहाजबांधणीच्या कामासाठी ठेवले होते."[२] त्यांच्या हाताखाली ४०० फिरंगी आणि स्वराज्यातील कारागीर पहिले २० गलबते बांधण्याचे काम करीत होते. तसेच या काळात मराठ्यांचा आणि सिद्दींचा पहिल्यांदाच आमना सामना झाला, त्यातून चकमकी घडू लागल्या परंतु या छोट्या मोठ्या चकमकीकडे लक्ष न देता "आज्ञापत्रकाराने" म्हणल्याप्रमाणे."आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यांगच आहे. जैसे ज्यास अश्वबल त्याची प्रजा पृथ्वी आहे, तसेच ज्याजवळ आरमार त्याचा समुद्र,याकरिता आरमार अवश्यमेव करावे."[३] ही भूमिका घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमार बांधने सुरूच ठेवले. "१६५९ पर्यंत महाराजांनी सिद्दीचा बराच प्रदेश काबीज केल्याचा उल्लेख कवी प्रमानंदाच्या काव्यातही मिळतो."[४] इसवी सन १६६५ मध्ये पोर्तुगीजांना पाणी पाजणारा वीरप्पा नाईक मरण पावल्यानंतर त्याच्या राज्यात अनागोंदी माजली तेव्हा पोर्तुगीज आणि ब्रिटीशांचा डोळा बसरूरच्या राज्यावर होता, परंतु मराठा आरमाराने छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्वात बसरूर वर चढाई केली आणि लहान मोठी अशी ८५ जहाजे मिळून मराठा आरमाराने आपला पहिला विजय प्राप्त केला. "माघ मासी राजश्री जाहजात बैसोन बसनुरास गेले.ते शहर मारून आले."[५] असा उल्लेख 'शिवचरित्रप्रदीप' या ग्रंथात आहे. बसरूर हे कानडी लोकांचे राज्य होते. बसरूर वरील स्वारीचा थोडक्यात आढावा असा, महाराज ८ फेब्रुवारी १६६५ ला मालोड बंदरातून सोळाशे सैनिकांसह आणि तीन मोठी जहाजे आणि पंच्याऐंशी लहान जहाजे घेऊन महाराज पोर्तुगीजांच्या हद्दीतून निघाले आणि गंगोळी बंदराजवळ आरमार उभे करून सैन्याची एकजूट करून बसरूरवर विजय मिळवला आणि कर्नाटकातील बंदरे ताब्यात घेऊन मोहिमेची सर्व लुट जहाजांद्वारे मालवण बंदरात पाठवून देऊन आंबोली घाटमार्गे महाराज २८ फेब्रुवारी १६६५ रोजी स्वराज्यात आले. "डच रेसिडेंसच्या माहितीनुसार ही लुट तीन लाख गिल्डर्स म्हणजेच सुमारे ६,६६००० इतकी होती." महाराजांनी बसरूर मोहिमेवेळी केळदीच्या राजाला मदत केली. या मोहिमेत सागरी युद्धाचा प्रसंग जरी नसला आला तरी या विजयाचे मराठा आरमाराच्या सागरावरील वर्चस्वाची ही मोहीम नांदी ठरली. ज्या प्रमाणे

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | *Website:* https://ijaar.co.in/
*Volume-13, Issue-2 | November - December 2025*

पोर्तुगीजांनी गोवा, दमण दीव येथील सागवानी लाकडाचा वापर करून जहाज बांधणीचा उद्योग विकसित केला होता, त्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी कुलाबा, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, राजापूर, पनवेल, कल्याण, भिवंडी या ठिकाणी कोकण प्रांतातील नैसर्गिक समृद्धतेचा वापर करून जहाज बांधणीचा उद्योग उभारला. “ ५ डिसेंबर १६६४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरतेची लुट केल्यानंतर त्यातून प्राप्त केलेल्या संपत्तीच्या माध्यमातून मालवण समोरील सिंधुदुर्ग या भक्कम जलदुर्गाची ‘कुरटे’ या बेटावर उभारणी करण्यास सुरुवात केली.”[६] जहाज बांधणी व्यवसायात सुरुवातीच्या काळात पोर्तुगीज तंत्रज्ञाची मदत घेण्यात आली नंतर मराठा आरमारात जहाजे पूर्णतः स्थानिक कुशल कारागिरांनी घडवली, खांदेरी बेटावर मराठा आरमाराचा तळ उभारण्यात आला त्यामुळे मुंबई बेटावर असणाऱ्या ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीच्या सामर्थ्यास मराठ्यांनी शह दिला. ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीने अडथळे निर्माण केले तरी आरमार तळ निर्मितीचे काम पूर्णत्वास नेण्यात आले.खाफीखानच्या वर्णनानुसार, “मराठ्यांनी जिबल, पाबल आणि त्या आसपासच्या भागात बंदरे आणि सागरी दुर्ग बांधून मुघल साम्राज्या अंतर्गत चालणारी सागरी वाहतूक आणि व्यापार लक्षणीयरित्या प्रभावित करून टाकला होता.” छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या मराठा आरमारामुळे व्यापाराला मोठी चालना मिळून मराठा काळात चौल,दाभोळ, संगमेश्वर, राजापूर, वेंगुर्ला, विजयदुर्ग, कल्याण, भिवंडी ही नऊ प्रसिद्ध व्यापारी बंदरे उदयास आली, अधिक प्रसिद्ध झाली. मराठा आरमारात खास करून मलबारच्या किनारपट्टीच्या भागात राहणारे कोळी समाजातील लोक आणि इतर समुद्री भागात राहणाऱ्या जमाती यांचा मोठ्या प्रमाणात समावेश होता. मराठाआरमाराच्या सहाय्याने मराठ्यांनी अरबी लोकांशी व्यापार-विनिमय सुरु केला होता.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पशाचात छ.संभाजी महाराज गादीवर आले. छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या कारकिर्दीत नौदलाचे आधुनिकीकरण करण्यास सुरुवात केली. त्यासाठी त्यांनी अरब नौदल सेनानी जंगे खान यांच्याशी करार करून त्यांना कोकणात मराठा नौदलाला जलद जहाज बांधणी, तोफखाना प्रशिक्षण आणि कुशल तोफाची तयार करण्यासाठी बोलावले. इसवी सन १६८१ च्या पूर्वार्धात सहा महिने कोकणात राहून मराठी आरमाराला आपल्या अरबी सैन्यासह प्रशिक्षण देण्याचे कार्य जंगे खान यांनी केले. परिणामतः त्यानंतर संभाजी महाराजांनी केलेली जंजिरा मोहीम, गोवा मोहीम या मोहिमेत मराठा आरमाराची प्रगती दिसून आली. इसवी सन १६८३ च्या उत्तरार्धात मराठ्यांची पोर्तुगीजां विरुद्ध सुरु असलेल्या गोवा मोहिमेच्या दरम्यान पोर्तुगीजांना मदत करण्यासाठी कोकणातील मराठ्यांच्या प्रदेशावर छापे टाकण्यासाठी एक लाख सैन्य, हजारो हत्ती, उंट, घोडे घेऊन रामदरा घाटमार्गे गोव्यात उतरणारा मुघल शहजादा मुअज्जम आणि त्याला

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-2 | November - December 2025

सुरत बंदरातून रसद पुरवणारे मुघल आरमार यांवर मराठा आरमाराने गनिमी काव्याने छापे घालून मुघल फौजेत अन्नधान्याची टंचाई केली. रोगराई, उपासमार यांनी हताश होऊन मुघल शहजादा मुअज्जम कोकणातून माघारी फिरला. कोकणातील अनेक मोहिमांत मराठा आरमाराने मराठा पायदळाला मोठ्या प्रमाणत मदत केल्याचे प्रकर्षाने जाणवते. मराठा आरमाराला भक्कम करण्याचे काम संभाजी राजांनी केल्याचे दिसून येते, संभाजी राजांमुळेच इसवी सन १६८९ पर्यंत मराठा आरमाराचे वर्चस्व उत्तर कोकणातील तारापूर ते उत्तर कर्नाटकातील कारवारच्या किनारपट्टीपर्यंत होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात नौदलाला फारसा युद्धाचा प्रसंग आला नसला तरी मराठा आरमाराने येणाऱ्या काळात मराठा आरमाराच्या उपयुक्ततेची चुणूक दाखवली होती, मात्र छत्रपती संभाजी महाराजांच्या काळात महाराजांनी आधुनिकतेची जोड देऊन नौदालाचे सामर्थ्य वाढवले. "मुंबईकर इंग्रजांनी संभाजी महाराजांशी सलोख्याचे सबंध ठेवण्यासाठी आपली माणसे पाठविली होती."[७] म्हणजेच मराठा आरमाराने भविष्यात जो पराक्रम गाजविला, त्या आरमाराचा पाया भक्कम करण्याचे कार्य छत्रपती संभाजी महाराजांनी केले.

**मराठा आरमाराचा भारतीय नौदलावरील प्रभाव:**

शिवाजी महाराजांनी आरमाराला राज्याच्या 'स्वतंत्र एक राज्यांग' (राज्याचा महत्त्वाचा आणि अविभाज्य घटक) मानले. आरमाराची निर्मिती हे शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचे प्रतिक आहे. "आजचे भारतीय नौदल हे जगातील पाचव्या क्रमांकाचे नौदल आहे."[८] भारतीय नौदलाची सुरवात इ.स. १९३४ मध्ये ब्रिटीशांनी स्थापलेल्या 'रॉयल इंडियन नेव्ही'(आरआयएन) या सेनेपासून झाली. भारतीय नौदलाचे जनक म्हणून ओळखले जाणारे छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यानंतर सरखेल कान्होजी आंग्रे यांनी रुजवलेल्या या आरमाराचा आजच्या भारतीय नौदल (Indian Navy) या सामर्थ्यशाली दलावर झालेला प्रभाव खालील प्रमुख मुद्यांवरून स्पष्ट होतो.

**१) तात्विक अधिष्ठान:**

मराठा आरमाराने भारतीय नौदलाला एक तात्विक बैठक प्राप्त करून दिली आहे. "शिवाजी महाराजांनी आरमाराला राज्याच्या 'स्वतंत्र एक राज्यांग' (राज्याचा महत्त्वाचा आणि अविभाज्य घटक) मानले."[९] आज भारतीय नौदलाला देशाच्या संरक्षणात आणि परराष्ट्र धोरणात जे महत्त्व दिले जाते, त्याचा पाया या दूरदृष्टीमध्ये आहे.

**२) स्वदेशीकरण (Indigenisation) आणि स्वावलंबनाची परंपरा:**

"छत्रपतींनी स्वराज्य टिकवण्यासाठी जहाजे आणि सागरी किल्ले स्वदेशी बनवण्यावर भर दिला.

हीच परंपरा आज 'आत्मनिर्भर भारत' धोरणातून पुढे जात आहे."[१०] शिवकाळात कल्याण, भिवंडी येथे लहान जहाजे बांधली जात होती. मराठा जहाजे (गुराब, गलबत) त्यांची गती आणि कुशलता यासाठी प्रसिद्ध होती. आजही भारतीय नौदल 'मेक इन इंडिया' अंतर्गत स्वदेशी युद्धनौका, पाणबुड्या आणि विमाने तयार करण्यावर भर देत आहे, ज्याचा मूळ स्रोत मराठा आरमाराच्या स्वदेशी बांधणीच्या धोरणात आहे. कान्होजी आंग्रे यांनी जहाज बांधणीसाठी आवश्यक असलेल्या सागवान लाकडाची लागवड आणि व्यवस्थापन केले होते. हा आजच्या नौदलाच्या लॉजिस्टिक आणि बेस व्यवस्थापनासाठी हा एक महत्त्वाचा धडा आहे.

**३) आधुनिक नौदलाच्या प्रतीकांमध्ये वारसा:**

सप्टेंबर २०२२ मध्ये भारतीय नौदलाच्या ध्वजाचे (Naval Ensign/Nissan) अनावरण झाले, तेव्हा मराठा आरमाराचा वारसा अधिकृतपणे स्वीकारला गेला. "नौदलाच्या नव्या ध्वजावरील 'सेंट जॉर्ज क्रॉस' (ब्रिटिशकालीन चिन्ह) हटवून, त्या जागी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेतून प्रेरणा घेतलेला अष्टकोनी आकार समाविष्ट करण्यात आला."[११] हा अष्टकोन आठ दिशांमधील सागरी सामर्थ्याचे प्रतीक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हा नवीन ध्वज छत्रपती शिवाजी महाराजांना समर्पित करून, मराठा आरमाराचा वारसा हा आधुनिक नौदलाच्या अस्मितेचा भाग असल्याचे स्पष्ट केले.

**४) आरमारी तळ आणि प्रशासकीय व्यवस्था:**

भारतीय नौदलाने आपल्या महत्त्वाच्या आस्थापनांना मराठा वीरांची नावे दिली आहेत. भारतीय नौदलाचे प्रमुख तांत्रिक प्रशिक्षण केंद्र (लोणावळा) (Technical Training Establishment) छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने ओळखले जाते. "INS आंग्रे (मुंबई) पश्चिम नौदल कमांडचे (Western Naval Command) प्रशासकीय आणि लॉजिस्टिक केंद्र मराठा आरमाराचे सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या नावाने ओळखले जाते."[१२]

**५) युद्धनीतीचा प्रभाव :**

सरखेल कान्होजी आंग्रे यांची युद्धनीती आजही नौदल अधिकाऱ्यांसाठी अभ्यासाचा विषय आहे. गुरीला नौदल नीती (Guerrilla Naval Tactics) चा उपयोग करून युरोपीय महाकाय जहाजांविरुद्ध कान्होजींनी लहान, वेगवान आणि कमी पाण्यात चालणारी जहाजे वापरून शत्रूला नामोहरम केले. ही नीती आधुनिक नौदलाच्या फास्ट अटॅक क्राफ्ट (Fast Attack Craft) आणि तटरक्षक दलाच्या जलद गस्ती नौकांमध्ये (Coastal Surveillance) वापरली जाते, जिथे शत्रूला अनपेक्षितपणे शह देणे महत्त्वाचे असते.[१३]

"ज्याचे आरमार, त्याचा समुद्र" हे तत्त्वज्ञान मध्ययुगात छत्रपती शिवाजी महाराजांनी अंगिकारले आणि तेच तत्त्वज्ञान आज भारतीय नौदलाच्या सागरी धोरणाचा कणा आहे. सुमारे ३५० वर्षांपूर्वी स्थापन झालेले मराठा आरमार हे

केवळ तत्कालीन साम्राज्याचे संरक्षण करणारे दल नव्हते, तर ते आधुनिक भारतीय नौदलाला दूरदृष्टी, स्वावलंबन आणि सागरी अस्मिता देणारा तेजस्वी वारसा आहे हे आजच्या नौदलाच्या कार्यातून दिसून येते.

**उपसंहार :**

छत्रपती शिवाजी महाराजांनी जमिनीवरील शत्रूंवर आपला वचक ठेवला होता, तसाच वचक महाराजांनी समुद्रातील शत्रूंवर ठेवण्यासाठी मराठा आरमाराची निर्मिती केली. कल्याण भिवंडीजवळील 'दुर्गाडी' या ठिकाणी मराठा आरमाराचा पाया घातला गेला. त्यासाठी पोर्तुगीजांची मदत घेण्यात आली. एकंदरीत स्थानिक सत्तांच्या दुर्लक्षामुळे, कोकण किनारपट्टीवर आणि समुद्रात प्रबळ आरमाराच्या अनुपस्थितीमुळे, किनारपट्टीवर समुद्रावर आणि पर्यायाने सागरी व्यापारावर परकीय सत्तांचे वर्चस्व निर्माण झाले होते, ते वर्चस्व झुगारून मराठा आरमाराने समुद्रात आपली सत्ता दृढ करून  पर्यायाने सागरी व्यापार-विनिमयावर नियंत्रण मिळवले.

मराठा आरमाराने सुरुवातीच्या वर्षात लाक्षणिक प्रगती केली, मात्र काही उणिवांमुळे मराठा आरमार हे पाश्चिमात्यांच्या तुलनेत मागासलेले राहिले.मराठा आरमाराच्या सुरुवातीच्या काळातील कामगिरीचे मूल्यमापन केले असता असे दिसून येत की मराठा आरमारामुळे कोकण किनारपट्टी आणि किनारपट्टीलगतच्या प्रदेशाला परकीय सत्तांच्या जाचापासून, लुटारूपासून, धर्मांतर आणि त्यावर आधारित अत्याचारापासून संरक्षण पुरवले जाऊन किनारपट्टीवरील प्रदेशात शांतता निर्माण झाली. स्थानिक रयतेला रोजगार प्राप्त झाला. किनारपट्टीवरील प्रदेशांत होणारे परकीय सत्तांचे अनन्वित अत्याचार रोखले गेले. प्रथमच परकीय सत्तांच्या आरमाराच्या समोर स्थानिक सत्तेचे बलाढ्य आरमार उभे राहिले यातूनच भारतीय नौदलाचा पाया घातला गेला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराचा व कार्याचा प्रभाव भारतीय नौदलावर आजही दिसतो. या संशोधनातून हे ठळक होते की मराठा आरमाराचा इतिहास हा केवळ एका सत्तेचा इतिहास नसून, तो भारतीय सागरी परंपरेच्या उगमाचा, विकासाचा आणि गौरवाचा इतिहास आहे. या वारशाचे संवर्धन, अभ्यास आणि आधुनिक सागरी धोरणांत त्याचा उपयोग करून घेणे ही आजच्या पिढीची जबाबदारी आहे.

**तळटीपा :**

१) बर्कारू, पृ. २२१, Studies in Indian History, पृ. २४१.
२) The English Factories in India (1655–1667), पृ. ७२.
३) सभासद बखर, पृ. ६५–६६.
४) कुलकर्णी, श्री. र., शिवकालीन राजनीती आणि रणनीती, पृ. ९२.

५) आपटे, वि.ण. (संपा.), श्री शिव भारतम, पृ. ५४, नोंद क्र. १८, श्लोक क्रमांक ५०.
६) कुलकर्णी, श्री. र., शिवकालीन राजनीती आणि रणनीती, पृ. २२३
७) इग्लिश रेकोर्ड, शिवाजी खंड २, पृ. ५१६–५१७.
८) मेहंदळे, गजानन भास्कर, शिवछत्रपतींचे आरमार, पृ. ३१.
९) Indian Navy
१०) Atmanirbhar Bharat Abhiyan – Go Digit
११) दैनिक लोकमत, दि. २ सप्टेंबर २०२२.
१२) आईएनएस आंग्रे | भारतीय नौसेना
१३) आईएनएस आंग्रे | भारतीय नौसेना

## संदर्भग्रंथ यादी :


१) मेहेंदळे, ग. भ. (2010). *शिवछत्रपतींचे आरमार* (प्रथम आवृत्ती). परम मित्र पब्लिकेशन.
२) केतकर, द. र. (2019). *भारतीय नौकानयनाचा इतिहास* (प्रथम आवृत्ती). मर्वेन टेक्नॉलॉजीज्.
३) पेंडसे, स. स. (2015). *मराठा आरमार: एक अनोखे पर्व* (प्रथम आवृत्ती). मर्वेन टेक्नॉलॉजीज्.
४) Abate, B. (1973). *A history of the Maratha navy and merchant ship* (First edition). State Board for Literature and Culture.
५) Sharma, S. R. (1944). *Maratha history (1295–1707)* (Revised edition). Karnataka Publishing House.
६) Sen, S. (1925). *The administrative system of Marathas* (Second edition). Calcutta University.
७) Sen, S. (1928). *The military system of Marathas* (Revised edition). Orient Longmans Pvt. Ltd.
८) Revised Edition, Orient Longmans Pvt. Ltd., 1928